**प्रेसनोट** दिनांक :– १४.०१.२०२२

**आरोपी लोकसेवक १)सचिन अजाबसींग अडबलवार, वय ४१ वर्षे, व्यवसाय नौकरी, वरिष्ठ सहायक, वर्ग–३, शिक्षण विभाग (प्राथमिक) जि.प. हिंगाली रा.आशीर्वाद निवास, जुना दशमेश हॉस्पीटलच्या पाठीमागे, कुंभारगल्ली, गुरूव्दारा गेट क्र.०२, नांदेड यांनी ३०,०००/–रू. च्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती २०,०००/–रू. लाचेची रक्कम दि.१३.०१.२०२२ रोजी स्वत: स्विकारली तसेच आरोपी लोकसेवक २)संतोष उर्फ अण्णा किशनराव मिसलवार, वय ५२ वर्षे, व्यवसाय नौकरी, कार्यालयीन अधीक्षक, वर्ग–३, शिक्षण विभाग, (प्राथमिक) जिल्हा परिषद, हिंगोली रा. जंजीरा निवास, शासकीय निवासस्थान, जि.प. हिंगोली, बिरसामुंडा चौक, हिंगोली यांनी ३०००/– रू. लाचेची मागणी करून ती रक्कम दि.१३.०१.२०२२ स्वत: स्विकारली**

---

पिडीत तक्रारदार यांनी दि.०६.०१.२०२२ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली येथे तक्रार दिली होती की, तक्रारदार यांचे आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याचे एक जादा वेतनवाढीचा मंजुरी आदेश काढल्याचा मोबदला व मंजुरी आदेशाची प्रत देण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक १)सचिन अजाबसींग अडबलवार, वय ४१ वर्षे, व्यवसाय नौकरी, वरिष्ठ सहायक, वर्ग–३, शिक्षण विभाग (प्राथमिक) जि.प. हिंगाली यांनी ३०,०००/–रू. च्या लाचेची मागणी करीत असलेबाबत तसेच आरोपी लोकसेवक २)संतोष उर्फ अण्णा किशनराव मिसलवार, वय ५२ वर्षे, व्यवसाय नौकरी, कार्यालयीन अधीक्षक, वर्ग–३, शिक्षण विभाग, (प्राथमिक) जिल्हा परिषद, हिंगोली हे तक्रारदार यांचे आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याचे एक जादा वेतनवाढीचा मंजुरी आदेशाचे फाईलवर सही करून मदत केल्याचा मोबदला म्हणुन ३०००/–रू. लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रार दिली होती.

त्यावरून दि.१०.०१.२०२२ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी केली असता यातील आलोसे क्र. १)सचिन अजाबसींग अडबलवार, वय ४१ वर्षे, व्यवसाय नौकरी, वरिष्ठ सहायक, वर्ग–३, शिक्षण विभाग (प्राथमिक) जि.प. हिंगाली यांनी ३०,०००/–रू. च्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती २०,०००/–रू. लाचेची रक्कम स्विकारण्यास सहमती देवुन दि.१३.०१.२०२२ रोजी लाचेची रक्कम २०,०००/–रू. जिल्हा परिषद कार्यालयातील कॅन्टीनमध्ये स्विकारली. तसेच आलोसे श्री मिसलवार यांनी दि.१०.०१.२०२२ रोजी ३०००/–रू. लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम दि.१३.०१.२०२२ रोजी शिक्षण विभाग जिल्हा परिषद, हिंगोली येथे स्विकारली आहे.

त्यावरून आलोसे १)सचिन अजाबसींग अडबलवार, वय ४१ वर्षे, व्यवसाय नौकरी, वरिष्ठ सहायक, वर्ग–३, शिक्षण विभाग (प्राथमिक) जि.प. हिंगाली आलोसे २)संतोष उर्फ अण्णा किशनराव मिसलवार, वय ५२ वर्षे, व्यवसाय नौकरी, कार्यालयीन अधीक्षक, वर्ग–३, शिक्षण विभाग, (प्राथमिक) जिल्हा परिषद, हिंगोली यांचे विरूध्द पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन दोन्ही आलोसे यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड परिक्षेत्र, नांदेड श्री धरमसींग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शना खाली हिंगोली युनिट येथील श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, हिंगोली, सपोउपनि/युनुस सिध्दीक, पोह/विजय उपरे, पोह/विजय शुक्ला, पोना/महारूद्र कबाडे, पोना/ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोना/तान्हाजी मुंढे, पोना/अविनाश किर्तणकार, पोशि/राजाराम फुपाटे, पोशि/सुजित देशमुख, चापोना/हिम्मतराव सरनाईक ला.प्र.वि. हिंगोली यांनी केलेली असुन सदर गुन्हयाचा तपास श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, हिंगोली हे करीत आहे.

ॲन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा.

**श्री धरमसींग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, – ९९२३४१७०७६**

**श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, हिंगोली – ९८२२२००९५९**

**टोल फ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२४५६–२२३०५५, संकेतस्थळ** www.acbmaharashtra.net